दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २५६ | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.१४ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## धावपट्टीजवळ गेल्याने मजुरावर गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**


नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातील इतर प्रकल्पात काम करणाऱ्या एका २५ वर्षीय मजुराने विमानतळ परिसराच्या पूर्व बाजूच्या कुंपणावरून आत उडी मारून विमानतळाच्या धावपट्टी व नियंत्रण कक्षाजवळील परिसरात वावर केला. यामुळे त्याच्यावर थेट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल केला.

विना परवानगी प्रवेश करून चोरीच्या उद्देशाने विमानतळात प्रवेश केल्याचा ठपका त्या मजुरावर ठेवण्यात आला आहे. सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदविली.

या मजुराला कामावरून काढून टाकले असून तो धावपट्टी व नियंत्रण कक्षाजवळील प्रवेश नसलेल्या ठिकाणी का गेला याची चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक सारीका झांजुर्णे व पथक करत आहेत.

# मुंबई-गोवा महामार्गावर अपघात ; २ ठार २ जखमी

**दै.रायगड नगरी । कोलाड**



मुंबई-गोवा महामार्गावरील पुई गावाच्या हद्दीत पुई स्टॉप जवळ कारची कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक या अपघातात दोघे जन ठार तर दोघे जन गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार शनिवार दि. १३/१२/२०२५ रोजी सकाळी ७.१५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादिच्या ताब्यातील कंटेनर क्र.एम. एच.११ डी. डी.०४२५ हा मुंबई-गोवा हायवे रोडने स्वतः चालवीत घेऊन मुंबई कडून कोलाड बाजुकडे येत असतांना मौजे पुई गावाच्या हद्दीत पुई बस स्टॉप जवळ आला असता पाठीमागून मुंबई-बाजूकडून कोलाड बाजुकडे जाणारी कार क्र. एम. एच. ४६ सि. यु. ८४५३ या गाडीवरील चालक हुसबान अब्दुल हमीद कारविनकर वय २० वर्षे रा. आंबेत ता. म्हसळा जि. रायगड यांने आपल्या ताब्यातील कार रस्त्याच्या परिस्थितीचा दुर्लक्ष करून वाहतूक नियमांचे उलंघन करून अतिवेगाने वाहन चालवून फिर्यादीच्या ताब्यातील कंटेनरला जोरदार ठोकर मारून हा अपघात झाला.

या अपघातात ओवेस सज्जाद सरखोत रा.वणी पो.पुरार ता. माणगांव जि. रायगड व सज्जाद अब्दुल सखुर सरखोत रा. वणी पो. पुरार ता. माणगांव जि. रायगड हे दोघे जन ठार तर हुसबान अब्दुल हमीद कारविनकर रा. आंबेत ता. म्हसळा जि. रायगड व सरजित सज्जाद सरखोत रा. वणी पो.पुरार ता. माणगांव जि. रायगड हे दोघे जण जखमी झाले असुन या अपघाताची माहिती मिळताच कोलाड पोलिस व रेस्क्यू टीम यांनी मोलाचे मदत केली असुन सदर अपघाताची नोंद कोलाड पोलिस ठाण्यात करण्यात आली असुन वरिष्ठाच्या आदेशाने पुढील तपास पोसई महाडिक कोलाड करीत आहेत.

## पनवेल महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८:३० वाजल्यापासून होणार आहे.या लोकार्पणाचा प्रमुख कार्यक्रम लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, पनवेल येथे दुपारी १:०० वाजता संपन्न होणार आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

महानगरपालिकेकडून कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध मान्यवर लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित रा-हणार आहेत. पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या या विकासकामांमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होऊन जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे.

पनवेल शहरातील विविध विकासकामांचे लोकार्पण : पिसार्वे तलाव पुर्नज्जीवित व सुशोभिकरण कामाचे लोकार्पण, कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे लोकार्पण, प्रभाग समिती-अ, खारघर येथील प्रभाग कार्यालय लोकार्पण, खारघर येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण, प्रभाग समिती ब कळंबोली नोड मधील आयडीबीआय बँक, सेक्टर- ८ ते सन शाईन सोसायटी पर्यंत काँक्रिटीकरण रस्त्यांचे लोकार्पण, प्रभाग समिती 'ब', कळंबोली येथील सेक्टर -८ई मधील प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, प्रभाग समिती क मधील कामोठे येथील सेक्टर-११ मध्ये प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, लोकनेते दि.बा. पाटील यांच्या बद्दल माहिती दर्शविणारे म्युरल व सुशोभित कक्ष (स्मारीका) कामाचे लोकार्पण

विविध विकासकामांचे भूमिपूजन : नवीन पनवेल पश्चिम सेक्टर- १८ माता व बालसंगोपन केंद्राचे भूमीपूजन, प्रधानमंत्री आवास योजना व मुख्यमंत्री आवास योजने अंतर्गत पनवेल बस स्थानकामागे कुष्ठरोग पिडीतांसाठी व खुल्या विक्रीसाठी प्रस्तावित गृहप्रकल्पांचे बांधकामाचे भूमीपूजन, प्रभाग समिती क मधील लायन्स गार्डन ते पी.डब्ल्यु डी. ऑफिस ते जुने कोर्ट ते बंदर नाका पर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण कामाचे भूमीपूजन, प्रभाग समिती ड व्यावसायिक दुकाने बहुमजली वाहनतळ बांधणे कामाचे भूमीपूजन

## 'उत्सव हॉटेल' ला भीषण आग



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सेक्टर १७ मधील पायल सोसायटी परिसरात असलेल्या उत्सव हॉटेलला अचानक भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच संजीवनी मित्र मंडळाचे समाजसेवक परेश घरत, रिपब्लिकन पार्टी (आठवले गट) पनवेल महापालिकेचे युवक अध्यक्ष अक्षय विकास अहिरे तसेच पंचशील नगर येथील जागरूक नागरिक तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्यात सहभागी झाले.

घटनेनंतर नागरिकांनी त्वरेने अग्निशामक दलाशी संपर्क साधून मदतकार्य सुरू केले. हॉटेलमधील कर्मचारी तसेच पायल सोसायटीतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवून मोठ्या अनर्थापासून बचाव करण्यात आला. अग्निशामक दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक नागरिक व समाजसेवकांनी विशेष सहकार्य केले. तातडीने दाखवलेल्या सतर्कतेमुळे मोठी हानी टळली. घटनेनंतर परेश घरत व अक्षय अहिरे यांनी प्रभागातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची मागणी केली. त्यांनी म्हटले की प्रभागातील रेसिडेन्शियल ठिकाणी चालणारी कमर्शियल दुकाने व गोडाऊन तातडीने बंद करण्यात यावीत. कमर्शियल क्षेत्रात पूर्वीपासून चालू असलेल्या हॉटेल किंवा आस्थापनांकडे वैध फायर सेफ्टी परवानग्या आहेत का याची तपासणी तात्काळ करावी. अग्नितांडव टाळण्यासाठी आस्थापनांनी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत याचा अहवाल मागवावा. दोन दिवसांत दोन ठिकाणी आग लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी अधिक सतर्कता बाळगून, होण्याआधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

## शनि मंदिराचा कारभार पुन्हा विश्वस्तांकडे

**अहिल्यानगर । वृत्तसंस्था**

देशभरात प्रसिद्ध असलेल्या अहिल्यानगर येथील शनि मंदिर विश्वस्तमंडळ बरखास्त करून प्रशासकाच्या हाती दिलेला कारभार उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पुन्हा विश्वस्त मंडळाकडे देण्याचा आदेश दिला असल्याची माहिती सचिव आप्पासाहेब शेटे यांनी दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून शनी विश्वस्त मंडळाचा वाद कोर्टामध्ये गेला होता. यात काही महिन्यांपूर्वी औरंगाबाद खंडपीठाने विश्वस्त मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमणुकीचा निर्णय दिला होता. त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून उपजिल्हाधिकारी आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या देवस्थानच्या विविध पदांवर नेमणूक देखील केल्या, मात्र विस्त विश्वस्त मंडळाकडून उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवर आज सुनावणी झाली असून उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने प्रशासकाकडे असलेला कारभार काढून घेऊन पुन्हा विश्वस्त मंडळाकडे द्यावा, असा निर्णय दिला आहे.

## बदलापूरातील नीरजा आंबेकरांचा मृत्यू नव्हे तर हत्याच

### हल्ल्यात अटक झालेल्या आरोपीची ३ वर्षापूर्वी केलेल्या गुन्ह्याची कबूली

**दै.रायगड नगरी । बदलापूर**

बदलापूरात काही दिवसांपूर्वी एका तरुणावर प्राणघातक हल्ला झाला होता. त्या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी अटक केली. तपासादरम्यान अटक करण्यात आलेल्या आरोपीने असा काही धक्कादायक खुलासा केला की, त्याने पोलीस देखील चक्रावून गेले आहेत. सुमारे ३ वर्षापूर्वी काँग्रेसच्या महिला पदाधिकारी नीरजा आंबेकर यांचा मृत्यू झाला होता. तो मृत्यू नव्हता तर ती हत्या होती. हत्या करणारा तिचा व्यावसायिक पती रुपेश आंबेकर हा होता. त्याने सर्पदंश देऊन त्याच्या पत्नीची म्हणजे नीरजा आंबेकर यांची तीन साथीदारांसोबत हत्या केली होती. याप्रकरणी बदलापूर पोलिसांनी चौघांना अटक केलेली आहे.

बदलापूरमध्ये निवडणुकीच्या दरम्यान काही दिवसांपूर्वी एका तरुणावर हल्ला झाला होता. या प्रकरणात मुख्य आरोपी ऋषिकेश चाळके याला पोलिसांनी अटक केली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश गज्जल करीत होते. चौकशीदरम्यान ऋषिकेशने एक मोठा खुलासा केला. पोलिसांनी त्याला विचारलं की, 'तू अजून काय काय केलं आहे', त्यावेळी तो पोपटासारखा बोलू लागला. त्याने सांगितलं की, '३ वर्षापूर्वी बदलापूरमधील काँग्रेसच्या महिला पदाधिकारी नीरजा आंबेकर यांचा मृत्यू झाला होता. तो मृत्यू नसून ती हत्या होती. हा मृत्यू आकस्मिक झाल्याचं दाखविण्यात आलं होतं.' या प्रकरणात त्यावेळी एडीआर दाखल होते. या संपूर्ण प्रकरणात पुढे काही सुगावा मिळत नव्हता. तसेच कोणाचा काही आरोप देखील नव्हता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी तिथेच थांबवण्यात आली. मात्र, त्या मृत्यूचं खरं कारण आता समोर आलं आहे.



'नीरजा आंबेरकर यांचा मृत्यू नैसर्गिक का दाखवला गेला. पती रुपेश आंबेकर याने नीरजा यांची हत्या त्याच्या तीन साथीदारांच्या मदतीने केली होती. २०२२ मध्ये रुपेश आंबेरकर, चेतन दुधाने, कुणाल चौधरी आणि ऋषिकेशला घेऊन घरी गेला होता. त्याआधी त्याने घराच्या किचनमध्ये गोणीत साप आणून ठेवला होता. पत्नीच्या पायाची मालिश करण्याच्या बहाण्याने नीरजा यांना हॉलमध्ये झोपविले होते. त्यांच्यापैकी एकाने नीरजा यांच्या पायाला मालिश करण्यास सुरुवात केली. चेतन हा सर्पमित्र असल्यानं किचनमध्ये गोणीत ठेवलेला साप काढून ऋषिकेश चाळके याच्या हातात दिला'.

त्यानंतर ऋषिकेश चाळके याने हॉलमध्ये झोपलेल्या आणि नीरजा यांच्या पाठीवर रुपेश आंबेकर बसलेला असताना नीरजा यांच्या डाव्या घोट्याजवळ तीन वेळा सर्पदंश करुन जीवे ठार मारलं होतं. याचा उलगडा झाल्यानंतर नीरजा यांच्या हत्येच्या बातमीला वाचा फुटली आहे. याप्रकरणी आरोपी कुणाल चौधरी, रुपेश आंबेकर, चेतन दुधाने आणि ऋषिकेश चाळके यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात नीरजा यांच्या मृत्यूचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या डॉक्टरांची देखील चौकशी केली जाणार आहे', असं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे.

## महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजना प्रभावी : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सामान्य नागरिकांचे हित केंद्रस्थानी ठेवून कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी महिलांच्या सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी दूरदृष्टीपूर्ण, प्रभावी आणि समाजाभिमुख योजना अंमलात आणल्या आहेत. या योजनांमुळे महिलांना आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची नवी दिशा मिळत असून त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर अधिक भक्कम होत आहे, असे प्रतिपादन कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (दि. १३) येथे केले.



पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या घरघंटी व शिलाई मशीन वाटप उपक्रमाचा पुढील टप्पा आजपासून सुरु झाला. काही दिवसांपूर्वी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता. शहरी भागातील प्रभाग १४ ते २० मधील लाभार्थी महिलांना आज मशीनचे वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांतर्गत एकूण ४,२५० पात्र महिलांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात मोठ्या संख्येने महिलांना शिलाई मशीन व घरघंटीचे वाटप करण्यात आले होते. आजपासून शहरी भागातील लाभार्थी महिलांना मशीन व प्रमाणपत्रांचे वाटप करून हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेण्यात येत आहे. यावेळी आयोजित यंत्रसामुग्री भव्य कार्यक्रमात ते प्रमुख मान्यवर म्हणून बोलत होते. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून या कार्यक्रमात उपस्थित सर्वांना 'बालविवाह विरोधात' शपथ देण्यात आली.

मार्केट यार्ड येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, माजी नगर-सेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, एकनाथ गायकवाड, प्रभाकर बहिरा, रघुनाथ बहिरा, मुकीत काझी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, डॉ. सुरेखा मोहोकर, वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, वर्षा नाईक, नीता माळी, रेणुका मोहोकर, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, रुपेश नागवेकर, उमेश इनामदार, केदार भगत, प्रीतम म्हात्रे, संयोजक संतोष पवार, ॲड. चेतन जाधव, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष हिमेश बहिरा, सपना पाटील, भीमराव पोवार यांच्यासह हजारोच्या संख्येने लाभार्थी उपस्थित होत्या.

विमानतळाच्या नामकरणासंदर्भात बोलताना, भाजपचे सरकार आले आणि लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा ठराव झाला. मात्र दिबांच्या नावाला तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने विरोध केला होता. दिबांच्या नावासाठी आम्ही लढा उभारला आमच्यावर विमानतळ नामकरणाच्या पाच पाच फौजदारी गुन्हे आहेत त्यामुळे विरोधकांनी गमजा मारू नयेत असा सल्लाही त्यांनी दिला. पुणे येथील विमानतळाला जगतगुरु संत तुकाराम, संभाजी नगर विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात येणार तेथेही तांत्रिक प्रकियेमुळे उशीर होत असून दिबांचेच नाव विमानतळाला असणार आहे असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

# संन्यस्त राजकारणी शिवराज पाटील-चाकूरकर

चाळीस वर्षांहून अधिक काळ सत्तेच्या परिघात राहूनही संन्यस्तासारखे निर्लेप, निर्मळ आणि निर्मोही असणे हल्लीच्या काळात तसे दुर्मीळच. लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री, राज्यपाल अशी महत्त्वाची पदे भूषविलेले शिवराज पाटील-चाकूरकर हे त्यापैकी होते! लातूरचे नगराध्यक्ष ते केंद्रीय गृहमंत्री हा त्यांचा राजकीय प्रवास नदीच्या प्रवाहासारखा नितळ, स्फटिकासारखा पारदर्शक आणि नैतिकतेचा आदर्श वस्तुपाठ ठरावा असा आहे. त्यांच्या एकूण राजकीय कारकिर्दीत कसलेही डावपेच नव्हते. लबाडी नव्हती. तत्त्वांशी, निष्ठेशी आणि राजकीय विचारधारेशी तडजोड नव्हती. आयुष्यभर काँग्रेस पक्षाशी जे एकनिष्ठ राहिले, त्या निष्ठावंत पिढीचे ते प्रतिनिधी होते. मुळात, त्यांचा पिंड राजकीय नव्हता. निष्णात विधिज्ञ म्हणून त्यांचा नावलौकिक असतानाच्या काळात केवळ लोकाग्रहास्तव ते लातूरचे नगराध्यक्ष झाले. पुढे आमदार आणि तब्बल सात वेळा ते लोकसभेवर निवडून गेले. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या काळात त्यांनी संरक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुऊर्जा, वाणिज्य अशा विविध खात्यांची जबाबदारी सांभाळली. विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे मंत्री म्हणून भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (इस्रो) अत्याधुनिक बनविण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले. लोकसभाध्यक्ष पदावरील त्यांची कारकीर्दही उल्लेखनीय ठरली. लोकसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण, संसदीय कामकाजाचे संगणकीकरण, संसद ग्रंथालयाची इमारत आणि उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार आदी उपक्रम त्यांच्याच कारकिर्दीत सुरू झाले. ते लोकसभाध्यक्ष असताना अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी, सुषमा स्वराज्य, जॉर्ज फर्नांडिस, शरद यादव यांसह डाव्या पक्षातील दिग्गज नेते विरोधकांच्या बाकांवर होते. मात्र, चाकूरकर यांनी या सर्वांचा तितकाच सन्मान राखला. नरसिंह राव यांच्या सरकारला अडचणीत आणण्याचे, कोंडीत पकडण्याचे अनेक वादळी प्रसंग घडले, पण त्यांनी अतिशय संयमाने परिस्थिती हाताळली. सभागृह चालवण्याची त्यांची विलक्षण हातोटी पाहून अटलजी एकदा मिश्कीलपणे म्हणाले, 'शिवराजजी, आपने इस सभागृह की गरिमा बढाई हैं, इसी पदपर हमेशा बने रहो!' अटलजींच्या या वाक्याने सभागृहात एकच हशा पिकला. पण, ती चाकूरकरांच्या निष्पक्षतेला मिळालेली प्रशस्त दाद होती! ते महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष असतानाचा एक प्रसंग. देशातील एका मोठ्या नेत्याचे निधन झाल्याचे वृत्त सभागृहात आले. सदस्यांनी श्रद्धांजलीचा ठराव मांडण्याचा आग्रह केला. चाकूरकर म्हणाले, 'परिवाराकडून अधिकृत घोषित होईपर्यंत आपण प्रतीक्षा केली पाहिजे!' झालेही तसेच. या प्रसंगानंतर चार दिवसांनी त्या नेत्याचे देहावसान झाले. तो काळ असा होता की, खासदार अथवा मंत्र्यांच्या शिफारशीशिवाय टेलिफोन अथवा स्कूटर मिळत नसे. त्यांच्याकडे तंत्रज्ञान खात्याची जबाबदारी असताना, एकाने टेलिफोनसाठी त्यांना आग्रह केला. त्यावर ते म्हणाले, 'मी वैयक्तिक शिफारस करू शकत नाही. तुम्हाला टेलिफोन हवा असेल, तर तुमच्या गावासाठी टेलिफोन एक्सचेंजची मागणी करा!' इतका तत्त्वनिष्ठ राजकारणी विरळाच. सार्वजनिक जीवनात असूनही शिवराज पाटलांनी कधीच कोणाचा द्वेष केला नाही. निवडणुकीतील प्रचारात विरोधकांवर टीका-टिप्पणी, आरोप करण्याऐवजी ते सरकारच्या कामगिरीवर, भारताच्या भवितव्यावर बोलत असत. प्रचाराच्या रणधुमाळीत अशा प्रबोधनात्मक भाषणांना कशी दाद मिळणार? म्हणून मग विलासराव देशमुख किल्ला लढवत. समाजवादी नेते बापूसाहेब काळदाते यांनी एका भाषणात चाकूरकरांना भाकड गाईची उपमा दिली. यावर काही निकटवर्तीयांनी प्रतिक्रिया विचारली असता, स्मितहास्य करत म्हणाले- 'बापूंनी मला गाय म्हटले?, मी नशिबवान आहे!' निवडणुकीच्या निकालादिवशी ते गीतेतील कर्मयोग वाचत असत. हार-जीतच्या पलीकडची विलक्षण स्थितप्रज्ञता त्यांच्या ठायी होती. काँग्रेस पक्ष, गांधी घराण्याशी ते एकनिष्ठा होते. म्हणूनच, २००४ साली लोकसभा निवडणुकीत पराभूत झाले तरी, सोनिया गांधी यांच्या आग्रहापोटी ते देशाचे गृहमंत्री झाले. दुर्दैवाने २६/११ची घटना घडली. या दहशतवादी हल्ल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगड या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणून जबाबदारी पार पाडली. अत्यंत अभ्यासू, मितभाषी आणि सौजन्यशील ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. अध्यात्मात त्यांना रुची होती. पुट्टपर्थी सत्यसाईबाबांचे ते निस्सीम भक्त होते. डाव्या पक्षांनी त्यांच्या या 'धार्मिक' बाजूवर आक्षेप घेतला नसता, तर कदाचित ते पंतप्रधान झाले असते! चाकूरकर यांच्या निधनाने आपण एका सुसंस्कृत, सौजन्यशील व्यक्तिमत्त्वाला मुकलो आहोत. भावपूर्ण श्रद्धांजली !

# देशाला काँग्रेसशिवाय पर्याय नाही : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

सर्वसामान्य गोर गरीब जनता महागाईच्या आगीत होरपळून निघाली आहे. सत्ताधाऱ्यांना जनतेशी देणेघेणे नाही. जेलमध्ये जाण्यापेक्षा भाजपमध्ये जाणारी मंडळी वाढली आहे.

भाजपमध्ये गेलेल्यांची अवस्था 'ना घर का ना घाट का' अशी झाली आहे. तेथे भल्याभल्यांना शेवटच्या रांगेत उभे राहावे लागतेय. त्यांना उंबरठ्या बाहेर ठेवले जात आहे.

त्याउलट परिस्थिती काँग्रेसमध्ये आहे. कार्यकर्त्यांना काँग्रेसमध्ये सन्मान आहे. काँग्रेस पक्ष सर्वधर्म समभाव जोपासतोय. त्यामुळे देशाला काँग्रेसशिवाय पर्याय नाही, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत विंधणे येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते आई गावदेवी क्रिकेट चषकाचे उद्धाटन झाले.



यावेळी त्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली. उरण तालुक्यात खोपटे ते विंधणे अशी काँग्रेसची भव्य रॅली काढण्यात आली. महेंद्रशेठ घरत रॅलीच्या माध्यमातून विंधणे येथील क्रिकेट मैदानावर आले. फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर क्रिकेट स्पर्धांचे उद्धाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी मैदान काँग्रेसमय झाले होते. जुनेजाणते निष्ठावंत कार्यकर्ते एकत्र आल्याने महेंद्रशेठ घरत यांनाही आनंद झाला. त्यांनी सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आणि आभारही मानले.

यावेळी मिलिंद पाडगावकर- महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस, मार्तंड नाखवा- अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश फिशर मॅन, विनोद म्हात्रे- तालुका अध्यक्ष, डॉ. मनिष पाटील- माजी सदस्य रायगड जिल्हा परिषद, अलंकार परदेशी, अविनाश ठाकूर, मुरलीधर ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, लंकेश ठाकूर, वैभव पाटील, संजय ठाकूर, विनोद पाटील, घनश्याम पाटील, बी. एम. ठाकूर, रामनाथ पंडित,अंगद ठाकूर, राजेश ठाकूर, उमेश भोईर, विवेक म्हात्रे,आनंद ठाकूर, मंगेश म्हात्रे, प्रसाद पाटील आणि विंधणे येथील काँग्रेसचे जुनेजाणते कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कारच्या धडकेत वकील जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्ता क्रॉस करत असताना कारने धडक दिल्याने २८ वर्षीय वकील जखमी झाले. या अपघातप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात अनोळखी कारचालकावर गुन्हा दाखल झाला आहे . सिद्धेश शंकर साखरे हे कशेळे, कर्जत येथे राहत असून ते पनवेल कोर्टात आले होते. ते मित्रांसह पायी घरी जात असताना सातच्या सुमारास आशियाना सोसायटीच्या समोरील रस्त्यावरून रस्ता क्रॉस करत होते. पनवेल कोर्टाकडून वडाळे तलावाच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव कारचालकाने त्यांना धडक दिली. यात खाली पडून ते जखमी झाले.

# राज्यात आयुष्मान भारत व फुले जन आरोग्य योजनेचा मोठा विस्तार ; २३९९ उपचार कॅशलेस

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत महत्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. यामुळे आरोग्यव्यवस्थेतील कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवा गुणवत्तेत मोठी होत आहे. जानेवारी २०२५ पासून उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटी मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी दिली.

उपचार पॅकेजच्या दरात वाढ करून रुग्णालयांना दर्जेदार सेवा देण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. छ-इक व छट-ड मानक पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांना १० ते १५ टक्के अतिरिक्त प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी व तक्रार निवारणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती तसेच पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणी कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी २४ तास टोल फ्री कॉल सेंटर उपलब्ध असून, १५५३८८ / १८०००२३३२२०० व १४५५५ / १८००१११५६५ या क्रमांकांवर माहिती व तक्रारी नोंदवता येणार आहेत.योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया, तपासण्या, औषधे, इम्प्लांट्स, जेवण व एक वेळचे प्रवास भाडे पूर्णपणे मोफत व कॅशलेस देणे रुग्णालयांना बंधनकारक असून, उपचार नाकारल्यास किंवा रक्कम मागितल्यास संबंधित रुग्णालयावर दंड, निलंबन किंवा अंगीकरण रद्द करण्याची कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व या योजनेस पात्र आहे, नागरिकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माणगाव क्रीडा संकुल भग्नावस्थेत

## खेळाडूंच्या स्वप्नांवर उदासीनतेची धूळ

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव शहरातील क्रीडा विकासाचा कणा मानले जाणारे माणगाव क्रीडा संकुल आज अक्षरशः भग्नावस्थेत गेले असून, येथील खेळाडूंमध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरली आहे. कधीकाळी खेळाडूंच्या सरावाने गजबजलेले हे संकुल आज दुर्लक्ष, उदासीनता आणि निष्क्रियतेचे प्रतीक बनले आहे. संकुलातील खेळांचे व व्यायामाचे साहित्य मोडकळीस आले असून, काही साहित्य अडगळीत तर काही थेट भंगारात पडले आहे. परिणामी,नव्या साहित्याच्या प्रतीक्षेत असलेले खेळाडू आजही रिकाम्या हाताने सराव करत आहेत.

क्रीडा संकुलाची इमारत ठिकठिकाणी तडकलेली, गळती लागलेली व असुरक्षित अवस्थेत दिसून येत आहे. पावसाळ्यात छतामधून पाणी गळत असल्याने आतील भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते.

संकुलाला संरक्षण भिंत नसल्यामुळे मौल्यवान क्रीडा साहित्य चोरीला गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. शासनाकडून कोणतीही नियमित देखभाल, दुरुस्ती किंवा सुरक्षा व्यवस्था नसल्याने हे संकुल अक्षरशः वाऱ्यावर सोडल्याचे चित्र आहे. या क्रीडा संकुलाचे भूमिपूजन २००४ साली झाले होते, तर उद्घाटन २००९ मध्ये तत्कालीन मंत्री व सध्याचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले होते.

क्रीडा क्षेत्राच्या विकासाची मोठी स्वप्ने दाखवून उभारण्यात आलेले हे संकुल मात्र उद्घाटनानंतर हळूहळू दुर्लक्षित होत गेले. विशेष म्हणजे, या संकुलासाठी धवलारकर या दानशूर व्यक्तीने शासनाला जमीन दान दिली होती. मात्र, आज त्याच जागेवर उभे असलेले संकुल खेळाडूंना उपयोगी पडत नसल्याने दानशूर दात्याच्या योगदानालाही अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

मध्यंतरी कोकण विभागीय क्रीडा संकुल माणगाव येथे मंजूर केल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, ही घोषणा आजतागायत हवेतच विरून गेली असून, प्रत्यक्षात कोणतीही ठोस हालचाल दिसून आलेली नाही. त्यामुळे खेळाडूंच्या अपेक्षांचा भंग झाला असून, शासन केवळ घोषणा करून जबाबदारी झटकत असल्याचा आरोप होत आहे.

# रस्त्यांवर खड्डे खड्ड्यात आहे झाडाची फांदी; अपघाताची दाट शक्यता



**दै.रायगड नगरी । तळा**

अलिबाग रोहा साई या राष्ट्रीय महिमार्गाला जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. राणेचीवाडी येथे जाताना रस्त्याला मोठा खड्डा पडला आहे राणेचीवाडी रहिवाशांसह वानस्ते, मालुक, मालुककोंड, पन्हळी, कासेखोल, चोरवली, वांजळोशी, बोरिचामाळ, तळेगाव, उसरखुर्द, दहिवली, वावेमांद्रज, वृंदावन, चरईखुर्द, बेलघर, तळघर, खैराट, तांबडी, माणगाव, म्हसळा मार्गे ये-जा करण्यांचा मुख्य रस्ता आहे या रस्त्यावर भला मोठा खड्डा पडला आहे या खड्ड्याची डागडुजी करण्या ऐवजी या खड्ड्यात झाडाची फांदी लावून प्रवासी वर्गाच्या जीविताशी खेळ खेळण्याचा प्रकार सध्या सुरू आहे तळा नगरपंचायत प्रशासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष असल्याने प्रवाशी वर्ग आणि ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

नागरिकांना तळा शहर आणि अलिबाग रोहा साई या राष्ट्रीय महामार्गास जोडणारा हा एकमेव रस्ता आहे. रस्त्याच्या काही अंतरावर चंडिका मातेचे मंदिर,तळा पोलिस ठाणे,कुणबी भवन,एस. एस.निकम इंग्लिश स्कूल असल्याने नेहमी येथे वर्दळ असते या रस्त्याने विद्यार्थी, बालक, पालक आणि भाविकांची नेहमी गर्दी असते. इंदापुर आगरदंडा या राष्ट्रीय महामार्गास जोडणारा हा मुख्य रस्ता असल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांची नेहमीच वर्दळ असते, त्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांना त्यांच्या घरी जाण्याकरिता खड्ड्यात लावलेल्या झाडाच्या फांदीतून मार्ग काढावा लागत असल्याने त्यांना चांगलीच कसरत करावी लागत आहे. रस्त्याने अनेकदा किरकोळ अपघात सुध्दा झाले आहेत. त्यामुळे नागरिक मनात अपघाताची भिती घेऊन या मार्गे ये-जा करीत असतात.

तळा नगरपंचायत हद्दीतील राणेचीवाडी प्रभाग क्रमांक १७ येथील रस्त्यावर हा भलामोठा खड्डा असून गेली अनेक महिने ही समस्या नागरिकांना भेडसावत आहे याची माहिती नगरपंचायत प्रशासनाला असून देखील त्यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे विशेष म्हणजे या प्रभागातील निवडून आलेल्या नगरसेविका माधुरी घोलप या तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा आहेत त्यांच्याकडून नागरिकांच्या खूप अपेक्षा आहेत रस्त्यावरील या खड्ड्यामुळे अपघात होण्यापूर्वी या खड्ड्यात लावलेली झाडाची फांदी काढून हा खड्डा ताबडतोब बुजविण्यात यावा याची डागडुजी करावी अशी मागणी प्रवाशी वर्ग आणि ग्रामस्थ यांच्याकडून होत आहे.







## PUBLIC NOTICE

notice is hereby given that the documents Bearing original, APARTMENT DEED between CIDCO MAHARASHTRA Ltd AND SHRI JAGDISH KUMAR P. GELOTH , ALLOTMENT LETTER , POSSESSION LETTER AND SHRI JAGDISH KUMAR P. GELOTH has been misplaced and not traceable yet.

If found kindly inform to ADV. MANJIT KAUR SANDHU at gurusankalp co- op housing ,shop no 12 , kalamboli 410218

**Description of lost/ misplaced original documents**

All the piece and parcel OF land situated at LIG II, APARTMENT NO H-64 SECTOR 2E, at KALAMBOLI, ( NAVI MUMBAI), TAL PANVEL, DIST RAIGAD.

Any person who finds the said title documents should intimate to the undersigned & if any person, bank, financial institution having any claim or right in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage ,lease ,lien , license ,gift, possession or encumbrance howsoever or otherwise or having above documents is hereby called upon to intimate to the undersigned within 7 days from the date of publication of this notice of his such claim &the claims, if any of such person shall be treated as waived & not binding on our clients.

SD/-
**ADV. MANJIT KAUR SANDHU**
7738900770



## पनवेल महानगरपालिका

**सार्वत्रिक निवडणूक-२०२५**
**प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्धीची**

**जाहिर सुचना**

मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि.१३.११.२०२५ च्या सुधारीत वेळापत्रकानुसार पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस आस्तित्वात असलेल्या पनवेल विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिकाच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता तयार केलेली प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागवण्यासाठी दि.२०.११.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि.२६.११.२०२५ ने सुधारित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दि.०३.१२.२०२५ होता. सदर दिनांकापर्यंत प्राप्त हरकती व सूचनाबाबत योग्य ती कार्यवाही पूर्ण करून पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रभाग क्र. १ ते २० च्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या सुधारीत कार्यक्रमानुसार नागरिकांच्या माहितीसाठी सोमवार दि.१५.१२.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून सदरच्या अंतिम मतदार याद्या खालील नमूद ठिकाणी मतदाराच्या व नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. पनवेल महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग)
२. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com)
३. महानगरपलिकेची सर्व प्रभाग कार्यालय व उपविभाग नावडे.

जा.क्र :- पमपा/नि.वि/अं.म.या.प्र/२१२५/१८८/१०३/२०२५
दिनांक :- १४/१२/२०२५

सही
(आयुक्त)
पनवेल महानगरपालिका


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -410206

दुरध्वनी कार्यालय : 022- 27458040/41/42
फॅक्स नं. : 022- 27452233
वैद्यकीय आरोग्य विभाग : 022 – 27455751
आयुक्त कार्यालय : 022- 27452339
ई-मेल : mohpmc05@gmail.com
वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि.का./1786/सन 2025-26
दिनांक:- 13/12/2025

# पदभरती जाहिरात

**वाचा :- 1**.मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन 2025-26 नुसार मंजुर पदे **2**.महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. मपवैप/ आसे/ पदभरती/ 336/ 2022 दि.21.12.2022 **3**.मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे कडील पत्र जा. क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/ सुधारित पदभरती समिती /10266-10600/2023 दि.26.04.2023 **4**.मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे कडील पत्र जा. क्र.राआसोमुं / मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /10670-11016/2023 दि.27.04.2023. **5**.सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र जा.क्र. रानाआअ /शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/24004-24187/23 दि 24.05.2023 **6**.शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - 2021 / प्र.क्र. 77 / 16 क दिनांक 06.03.2024 **7**. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र जा.क्र. राआसोमुं /मनुष्यबळ/ कं.पदभरती/ 27415-663/2024 दि.3.07.2024 **8**.शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - 2024 / प्र.क्र. 246(ई-848503)/ आरक्षण - 5 दिनांक: 23.09.2025 **9**.मा. आयुक्त महोदय यांची दि. 11.12.2025 मंजुर टिपणी.

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व पॉलिक्लिनिक अंतर्गत खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे रिक्त असलेल्या पदांवर निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. सदरची पदभरतीची प्रक्रिया पनवेल महानगरपालिकास्तरावर राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यात येणार आहेत. यानुसार पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी, अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट (Microbiologist) व विशेषतज्ञ (Specialist) या रिक्त पदांकरीता थेट मुलाखत (Walk in Interview) दिनांक 22.12.2025 व 23.12.2025 रोजी सकाळी 10.00 वाजता पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206 येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, LHV, स्टाफ नर्स (स्त्री), स्टाफ नर्स (पुरुष) व बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW)-पुरूष ही पदे गुणांकन पद्धतीने (Merit) भरण्यात येणार असल्याने इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर 21, कामोठे, पनवेल 410206, येथे दिनांक 13.12.2025 ते 26.12.2025 या कालावधीत सादर करावेत.पनवेल महानगरपालिकेकरीता मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार व शासनाकडील रिक्त कंत्राटी पदांच्या पदभरतीच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग, हिंदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व पॉलिक्लिनिक अंतर्गत रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी** | अजा -2<br>अज - 1<br>भजब - 1<br>एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 08** | MBBS with MMC Reg Preference will be given to for bond completion and experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 60,000/- |
| 2 | **अर्धवेळ वैदयकीय अधिकारी** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 06** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 30,000/- |
| 3 | मायक्रोबायोलॉजिस्ट | एकाकी पदास बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | MD Microbiology Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 75,000/- |
| 4 | **LHV** | अज - 1<br>एकुण - 01- | B.SC. Nursing / GNM with MNC Registration. Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/ |
| 5 | **औषधनिर्माता** | एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>**एकुण - 03** | 12th + Diploma (D Pharm) / B Pharm with MSPC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 17,000/- |
| 6 | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ** | अजा - 1<br>एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>**एकुण - 04** | 12th + Diploma with Maharashtra Paramedical Council Registration Preference will be given to experienced Candidates सदर पदाकरीता खालील संस्थेमधुन शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करावे. 1) DPU Dr.D.Y. Patil Vidyapeeth, Pune (Deemed University) (Under Section 3 of the UGC Act, 1956)2) Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik (Established by Govt. Of Maharashtra ) 3) Maharashtra State Board of Technical Education, 49, Kherwadi, Bandra (E) Mumbai. 4) Shreemati Nathibai Damodar Thackersey, Women's University, Mumbai- 400049. 5) Maharashtra University of Health Sciences, Nashik, India. 6) Tata Institute of Social Science, Devnar, Mumbai. | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 17,000/- |
| 7 | **मानसोपचार तज्ञ Psychiatrist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 03** | 1) MBBS with MD Psychiatric / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |
| 8 | **स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ** Obstetrician & Gynaecologist | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | 1) MBBS with MD / MS Gyn / DGO / DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every week. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 per patient checked of his/her speciality to maximum Rs.5000/ visit. |

## 15 वा वित्त आयोग (15 th Fc)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी | अजा - 1<br>अज - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>**एकुण - 04** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 60,000/- |
| 2 | स्टाफ नर्स (स्त्री) | अजा - 1<br>अज - 1<br>इमाव - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>अराखीव - 2<br>**एकुण - 07** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/- |
| 3 | स्टाफ नर्स (पुरूष) | एकाकी पदास बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/- |
| 4 | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) पुरूष | अजा - 1<br>अज - 1<br>विजाअ - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 06** | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 18,000/- |

## हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना (HBT)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **वैदयकीय अधिकारी** | अजा - 1<br>**एकुण - 01** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | 60,000/- |
| 2 | **स्टाफ नर्स (स्त्री)** | अज - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 02** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 20,000/- |
| 3 | **बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) पुरूष** | अराखीव - 1<br>**एकुण - 01** | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्ष | 18,000/- |
| 4 | **मानसोपचार तज्ञ Psychiatrist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 02** | 1) MBBS with MD Psychiatry / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |
| 5 | **त्वचारोग तज्ञ Dermatologist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | 1) MBBS with MD (Skin / VD), DVD, DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्ष | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |

उपरोक्त तक्यात नमुद केल्यानुसार अर्जदारांच्या थेट मुलाखतीद्वारे व गुणांकन पद्धतीनुसार निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार जाहिरातीत प्रसिध्द केलेल्या रिक्त पदांवर नियुक्ती दिली जाईल व उर्वरीत पात्र उमेदवारांची पदनिहाय प्रतिक्षायादी ठेवण्यात येईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर पदनिहाय प्रतिक्षायादी मधील उमेदवारांमधुन त्यांच्या गुणवत्ते प्रमाणे नियुक्ती दिली जाईल. सदर प्रतिक्षायादीचा वैधता कालावधी निवड यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन केवळ 01 वर्ष राहील. तसेच उमेदवारास एका पदापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावयाचा आहे. जाहिरातीमधील सर्व सुचनांचे व निकषांचे काळजीपुर्वक वाचन करून अर्ज विहित केलेल्या पद्धतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखतीदरम्यान सादर केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.**अर्जदाराची वयोमर्यादा**-1) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 25 एप्रिल 2016 चे शासन निर्णयानुसार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे. 2) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा 70 वर्षे पर्यंत राहील. तसेच वय वर्ष ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. 3) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. तथापि, कागदपत्रे पडताळणी दरम्यान सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या मंजुर मनुष्यबळ धोरणानुसार (HR Policy) वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.•

**The calculation of age for the contractual year shall be on date of publishing of advertisement.** (a) Minimum Age: No person shall be eligible for employment under National Health Mission, Maharashtra unless he/she has completed 18 years of age. (Annexure 1-2 & 3 NHM Circular dated 29.9.2018 & 28.05.2019) (b) Maximum Age for entry: Maximum age for entry shall be (1) 69 years for MO MBBS and specialists (2) 64 years for Nursing and Paramedical Staff and (3) For remaining posts 38 years for open category and 43 years for reserved category candidates. (c) No age bar for the employees already working under NHM and wish to apply for another post within NHM (d) Applicants above 60 years are mandated to produce physical fitness certificate certified by civil surgeon (Annexure 1- 2.NHM Circular dated 29.9.2018). (e) All NHM employees should not have any administrative or financial proceedings, penal proceedings, criminal or any other type of serious crime against him during previous government service period. (Annexure I - 2.NHM Circular dated 29.9.2018).• **Age limit for end of contractual service:** (1) The age limit for end of contractual service shall be (1) 70 years for MO MBBS and specialists (2) 65 years for Nursing and Paramedical Staff and (3) 60 years for remaining posts. (Annexure I-3.NHM Circular dated 28.05.2019) **अर्ज भरण्याबाबतच्या सुचना** –1) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्दयांची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी. 2) उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव माध्यमिक शालांत प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.3) जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात अचुक नमूद करावी. 4) जाहिरात प्रसिध्द केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष ) अचूक नमुद करावे.5) अर्जदार ज्या कार्यक्रमा अंतर्गत व ज्या पदासाठी अर्ज करत आहे त्या कार्यक्रमाचे व पदाचे नाव विहित नमुन्यातील अर्जावर सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.6) उमेदवारांस एका पदापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावयाचा आहे.7) अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.8) महिला अर्जदार विवाहित असल्यास व नावात बदल असल्यास **विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) किंवा** नावात बदल झाल्यामुळे (Govt. Gazette) मध्ये असा बदल जाहीर केल्याचे शासकीय राजपत्रामधील (Govt. Gazette) अर्जदाराचे नाव असलेल्या पानाची स्व - साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. 9) अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, सुरू असलेल्या भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. 10) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.11) उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.12) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत त्यांचे जात-प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र व वैध असलेले नॉन क्रिमिलेअर (Non Cremelayer) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात येतील.13) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता तसेच ई- मेल व मोबाईल नंबर अर्जामध्ये अचूक नमूद करावा.14) अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. त्याबाबतचे अर्जासोबतचे विहित नमुन्यातील अर्जदाराने स्वाक्षरी केलेले हमीपत्र सादर करावे. अर्जासोबत हमीपत्राचा नमुना देण्यात आलेला आहे.15) अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात, स्वसाक्षरीने व सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत

**शैक्षणिक अर्हता/पात्रता**-1) अर्जामध्ये शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.2) अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता असणे आवश्यक आहे.3) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रामध्ये नमूद गुण व गुणांची टक्केवारी ही अर्जातील नमुद टक्केवारी व गुण यांच्याशी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील. 4) अंतिम वर्षाच्या मिळालले गुण ग्रेड किंवा श्रेणी यांचे मध्ये असल्यास त्याचे रूपांतर गुणांच्या टक्केवारीमध्ये करून त्याबाबतचे संबंधित शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, शैक्षणिक परिषद किंवा विद्यापिठ यांचे प्रमाणपत्र (Conversion Certificate) अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे. 5) अर्जदारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकेची छायांकित स्वसाक्षांकित प्रत व इतर आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे सादर न केल्यास संबंधित उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.6) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ, शैक्षणिक संस्था, शिक्षण परिषद व विद्यापीठ यामधुनच प्राप्त केलेली असणे बंधनकारक आहे..7) अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल. त्यामुळे सदरची माहिती अपुरी किंवा चुकीची असु नये याची दक्षता घ्यावी.**8) वैदयकीय अधिकारी,मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांसाठी पात्र उमेदवारांनी थेट मुलाखती दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल**.

**अनुभव** –1) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच फक्त शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थांमधील केवळ पदाशी निगडीत अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.2) अर्जदाराने अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील रूजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर अनुभवाचा कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.3) अर्जदाराने ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे त्या पदाशी निगडित अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही. **संगणक अर्हता**-1) MS - CIT प्रमाणपत्र किंवा तत्सम पात्रता धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा व त्याबाबचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे. **लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र**-1. लहान कुटुंबाची अट दिनांक २३/०७/२०२० रोजी पासुन लागू करण्यात आलेले आहे. यानुसार दिनांक २३/०७/२०२० रोजी पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्जकरण्यास अपात्र ठरतील. 2. लहान कुटुंबाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जदारानेअर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. **अर्ज शुल्क** – १) अर्जदाराने अर्जा सोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे.खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.700/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.500/-असे अर्जाचे शुल्क राहील. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. A/c Name :- **Corporation Integrated Health and Family Welfare Society,** Bank Name :- Bank Of India A/C No :- 121210110080348 IFSC Code :- BKID0001212 2) अर्जदाराला ज्या ज्या पदासाठी अर्ज करावयाचाआहे, त्या प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे उपरोक्त नमुद केल्यानुसार धनाकर्ष अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. 3)राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतरकोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्रकरण्यात येतील, याची प्रकर्षाने नोंद घ्यावी. **उमेदवाराचा फोटोव स्वाक्षरी-** १) उमेदवाराने अर्जावरील फॉर्मवर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवरत्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्टफोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये. २) अर्जदाराने स्वाक्षरीसाठीराखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी .**निवड प्रक्रिया-** सदर कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती/10670-11016/2023 दि.27.04.2023 रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे आहेत.1) वैदयकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांचीनिवड थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) करण्यात येईल. सदर थेट मुलाखतीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

## गुणांकन पद्धती (थेट मुलाखतीसाठी)

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| 1 | Subject Knowledge | 10 |
| 2 | "Research & Academic Knowledge " | 10 |
| 3 | Leadership Quality | 10 |
| 4 | Administrative Abilities | 10 |

| अ.क्र | | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|---|
| 5 | Experience<br>a) For Govt. Experience<br>b) For Private Experience | 2 Marks for one year.<br>1 Marks for one year | 10 |
| | | | **एकुण गुण 50** |

जा.क्र. पमपा / जनसंपर्क / ३१२५/ प्र.क्र.७१३/७३७/२०२५ दिनांक - १२/१२/२०२५

पुढे पहा

